# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा

अर्थसंकल्पीय मा. स्थायी समिती सभा दि. ८/२/२०१९ रोजी आयोजित केली होती. सदर सभा तहकूब होऊन ती दि. ११/२/२०१९ रोजी विचार विनिमय करुन शिफारस करणेसाठी पुन्हा बोलविण्यांत आली. सदर सभेचा ठराव.

ठराव क्र. ५५२

दिनांक ११/०२/२०१९

**प्रस्तावाचा विषय:-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ अन्वये वसई विरार शहर महानगरपालिकेचे वृक्षप्राधिकरण, कर्जनिधी व विशेष योजनेसह अ व क अंदाजपत्रकाचे सन २०१८-१९ चे सुधारित व सन २०१९-२० चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाज मा. स्थायी समितीने विचारात घेऊन निर्णय घेणे.

**प्रस्तावाचा मजकुर :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ मधील तरतुदीप्रमाणे सविस्तर विचार विमर्ष करुन मा. स्थायी समितीने सन २०१८-१९ च्या सुधारीत अर्थसंकल्पासह सन २०१९-२० चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करणेसाठी, पी बजेट चे अंदाज, जेंण्डर बेटचे अंदाज व दिव्यांग कल्याण योजनांचे अंदाज यासह सर्वसाधारण अ अर्थसंकल्प, जल मल प्रवाह निधी क अर्थसंकल्प, वृक्ष प्राधिकारण अर्थसंकल्प, कर्ज निधी अर्थसंकल्प, सॅटेलाईट सिटी/ अमृत योजना विशेष निधी योजना अर्थसंकल्प याबाबत आयुक्त यांनी सादर केलेली तपशिलवार माहिती, अंदाज व प्रस्ताव विचारात घेण्यास शिफारस केली आहे.

**निर्णय :-** पी बजेट, जेण्डर बजेट व दिव्यांग कल्याणाचे बजेटसह सर्वसाधारण अ अर्थसंकल्प, जल मल प्रवाह निधी क अर्थसंकल्प, वृक्ष प्राधिकरण अर्थसंकल्प, कर्ज निधी अर्थसंकल्प, सॅटेलाईट सिटी/ अमृत योजना / विशेष निधी योजना अर्थसंकल्प याबाबतचे सन २०१८-१९ चे सुधारीत अंदाज व सन २०१९-२० चा मुळ अंदाज तयार करताना मा. स्थायी समितीने दि. ८/०२/२०१९ ते दि. ११/०२/२०१९ या कालावधीत सविस्तर चर्चा व विचार विमर्ष करुन खालीलप्रमाणे फेरबदलासह शिफारशी केल्या आहेत.

१ प्रस्तावाचे वाचन करतांना अर्थसंकल्पातील मुद्रणदोष दुरुस्त करण्यांत आले.

२ सा. प्र. कर्मचारी गणेश व पावसाळी साहित्य सन २०१९-२० मध्ये रु. ४ लक्ष ऐवजी रु. २० लक्ष तरतुद करण्यांत आली आहे.

३ कार्यालयीन कामाचे आय.एस.ओ. प्रमाणपत्र घेणे, क्रेडीट रेटींग करुन घेणे. सन २०१८-१९ मध्ये तरतुद ० ऐवजी रु. ५ लक्ष करण्यांत आली आहे

४ दिवाबत्ती विभाग अपारंपारीक उर्जास्त्रोत निर्मिती सन २०१९-२० मध्ये तरतुद ० ऐवजी रु. ५ कोटी करण्यांत आली आहे

५ अग्निशमन व्यवस्था समुह भ्रमणध्वनीसह दुरध्वनी खर्च/ बिनतारी संदेश यंत्रणा सन २०१९-२० मध्ये तरतुद रु. ८ लक्ष ऐवजी रु. २ कोटी करण्यांत आली आहे

६ सफाई कामगार सामाजिक सुरक्षा योजना सन २०१९-२० मध्ये तरतुद रु. १ हजार ऐवजी रु. १ कोटी करण्यांत आली आहे

७ सफाई कर्मचारी उन्नतीकरण व वैद्यकिय चिकित्सा कार्यक्रम सन २०१९-२० मध्ये तरतुद रु. रु.१ हजार ऐवजी रु. ५० लक्ष करण्यांत आली आहे

८ ऑपरेशन चार्जेस व लॅब चार्जेस, सोनोग्राफी व एक्सरे चार्जेस सन २०१९-२० मध्ये तरतुद ४० लक्ष ऐवजी २ कोटी करण्यांत आली आहे

९ महापौर सहाय्यता निधी सन २०१९-२० मध्ये तरतुद रु. ५० लक्ष ऐवजी रु. १ कोटी करण्यांत आली आहे

१० शाळा इमारत दुरुस्ती सन २०१९-२० मध्ये तरतुद रु. २० लक्ष ऐवजी रु. १ कोटी करण्यांत आली आहे

११ सत्कार व इतर समारंभ, व्याख्यानमाला, वकृत्वस्पर्धा, ग्रंथ संमेलन, गुवंणव शिक्षण सत्कार, व्यक्ती/ संस्थांसाठी महानगरपालिका भुषण पुरस्कार, महापौर चषक स्पर्धा व इतर सांस्कृतिक आणि क्रिडा कार्यक्रम सन २०१८-१९ मध्ये तरतुद रु. २ कोटी ऐवजी रु. २ कोटी ९५ लक्ष करण्यांत आली आहे.

१२ शवविच्छेदनगृह, शवागृह/ मॉरचुरी व्यवस्था सन २०१९-२० मध्ये तरतुद रु. ५० लक्ष ऐवजी रु. २ कोटी करण्यांत आली आहे

१३ रुग्णालय फॅक्स मशिन, झेरॉक्स मशिन व वातानुकूलीत यंत्रणा खरेदी सन २०१८-१९ मध्ये रु १ हजार ऐवजी रु. १२ लक्ष व सन २०१९-२० मध्ये तरतुद रु. १० लक्ष ऐवजी रु. २० लक्ष करण्यांत आली आहे

१४ कामगार वसाहत (२० % मा.क.यो.) सन २०१९-२० मध्ये तरतुद रु. ७५ लक्ष ऐवजी रु. १ कोटी करण्यांत आली आहे

१५ पुरुषांसाठी डायलेसिस हा नवीन लेखाशिर्ष तयार करुन सन २०१९-२० मध्ये रु. २ कोटी ५० लक्ष करण्यांत आले आहे.

१६ जेष्ठ नागरिकांसाठी मेमरी क्लिनिक हा नवीन लेखाशिर्ष तयार करुन सन २०१९-२० मध्ये रु. ४० लक्ष करण्यांत आले आहे

१७ विकास कामांव्यतिरिक्त प्रभाग समिती स्तरावरुन केल्या जाणाऱ्या व्यवहारासाठी विविध लेखाशिर्षांतर्गत उपलब्ध असणाऱ्या तरतुदी सद्यस्थितीत समप्रमाणात विभागणी करुन नियंत्रण ठेवणेत यावे व आवश्यकतेनुसार मा. आयुक्त सो. यांचे निर्देशाने त्या-त्या लेखा शिर्षातर्गत एकूण उपलब्ध तरतुदीच्या मर्यादेत प्रभागांतर्गत फेरफार करणे विशेष बाब म्हणून अनुज्ञेय राहील.

१८ विकास कामांसाठी निधीची कमतरता व आस्थापना खर्चाचे अनुज्ञेय मर्यादा विचारात घेऊन तद्नुसार उत्पन्न व खर्च नियंत्रीत करणेच्या दृष्टीने ठोस प्रयत्न करणेस शिफारस करणेत आली.

१९ अर्थसंकल्पासोबत सादर केलेल्या सबसीडी अहवालासह इतर सहपत्र तसेच मा. स्थायी समितीने अंतीमतः मान्य करुन शिफारस केलेल्या लेखाशिर्षनिहाय तरतुदींचा तपशिल अर्थसंकल्पाच्या प्रतीत नमुद करणेत आला असून सदर अर्थसंकल्पाची प्रत हा या ठरावाचा भाग मानला जाईल.

उपरोग्त फेरफारासह मा. स्थायी समितीने तयार करुन मा. महासभेपुढे सादर करणेस शिफारस केलेल्या सन २०१८-१९ चे सुधारीत अर्थसंकल्प व सन २०१९-२० चे मुळ पी बजेट, जेण्डर बजेट, दिव्यांग कल्याणाचे बजेटसह सर्वसाधारण अ अर्थसंकल्प, जल मल प्रवाह निधी क अर्थ संकप, वृक्ष प्राधिकरण अर्थसंकल्प, कर्ज निधी अर्थसंकल्प, सॅटेलाईट सिटी योजना / अमृत योजना / विशेष निधी योजना अंदाजपत्रक या सर्वांचा एकत्रित अर्थसंकल्पीय गोषवारा खालील प्रमाणे आहे.

(रु. कोटीत)

| लेखाशिर्ष | सुधारीत अर्थसंकल्प सन २०१८-१९ | मुळ अर्थसंकल्प सन २०१९-२० |
|---|---|---|
| प्रारंभिक शिल्लक | ४४१.२९ | ४०५.१५ |
| जमा रकमा | १३०७.५६ | १८५७.६८ |
| **प्रारंभिक शिलकेसह एकूण जमा रकमा** | **१७४८.८५** | **२२६२.८३** |
| **खर्च रकमा** | **१३४३.७०** | **२०२०.६७** |
| अखेर शिल्लक | ४०५.१५ | २४२.१६ |

सुचकाचे नाव :- किशोर नाना पाटील

व स्वाक्षरी :-

अनुमोदकाचे नाव :- आरिफ शेख

स्वाक्षरी :-

अनुकुल संख्या :- —

प्रतिकुल संख्या :- —

तटस्थ संख्या :- —

ठराव सर्वानुमते मंजूर

(सुदेश चौधरी)
सभापती तथा पिठासीन प्राधिकारी
स्थायी समिती
वसई विरार शहर महानगरपालिका

सत्य प्रत
महानगरपालिका सचिव
वसई-विरार शहर महानगरपालिका